दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक ३०८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.२ फेब्रुवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## नितेश राणेंना मोठा धक्का ; सत्र न्यायालयानंही अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

**सिंधुदूर्ग : वृत्तसंस्था**

शिवसैनिक संतोष परब यांच्यावरील हल्ल्याप्रकरणी संशयित आरोपी असलेल्या भाजपाचे आमदार नितेश राणे यांना सुप्रीम कोर्टापाठोपाठ आता सिंधुदुर्ग सत्र न्यायलायानं दणका दिला आहे. सिंधुदुर्ग सत्र न्यायालयानं नितेश राणे यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. त्यामुळे नितेश राणे यांच्यावरील अटकेची टांगती तलवार कायम आहे.

सुप्रीम कोर्टानं नितेश राणेंना १० दिवसांसाठी अटकेपासून संरक्षण दिलेलं असल्यानं पोलिसांना अद्याप नितेश राणेंना अटक करता येणार नाही. सुप्रीम कोर्टानं सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल करण्याचा सल्ला दिल्यानंतर नितेश राणेंनी सिंधुदुर्ग न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. त्यांच्या जामीन अर्जावर सोमवारी दोन्ही बाजूंनी युक्तिवाद करण्यात आला. सत्र न्यायालयात दोन्ही बाजूच्या वकिलांनी तब्बल साडेपाच तास युक्तिवाद केला. न्यायमूर्तींनी जामिनाचा निकाल मंगळवारी दिला जाईल, असे सांगत सुनावणी तहकूब केली होती.

# २०२२-२३ चा अर्थसंकल्प सादर ; कर रचना जैसे थे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**प्राप्तीकर भरणाऱ्यांसाठी महत्त्वाची घोषणा करण्यात आली आहे. या वर्षीही कर रचनेमध्ये कोणताही बदल करण्यात आला नसल्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी केली आहे. त्यामुळे गेल्या वर्षीप्रमाणेच या वर्षीही कर रचना समान असेल.**

### विमान प्रवास महागणार

आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ झाल्यानं विमान इंधनाचा दरही वाढले आहेत. फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्याच दिवशी विमान इंधनाच्या दरात ८.५ टक्क्यांची दरवाढ झाली आहे. त्यानुसार एटीएफच्या दरात ६७४३ रुपये प्रति किलोलीटर वाढ झाली आहे. सरकारी पेट्रोलियम कंपन्यांकडून दिल्या गेलेल्या माहितीनुसार दिल्लीत एटीएफची किंमत ७९,२९४.९१ रुपये प्रति किलोलीटरहून वाढून ८६३०८.१६ रुपये प्रति किलोलीटरवर पोहोचली आहे. जानेवारी महिन्यात याआधीच दोन वेळा एटीएफच्या किमतीत वाढ झाली होती.

पीएम आवास योजनेअंतर्गत २०२२-२३ या आर्थिक वर्षात ८० लाख घरं उपलब्ध करुन दिली जातील. यासाठी ४८ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, अशी माहिती अर्थमंत्र्यांनी दिली. यासाठी राज्य सरकारांसोबत मिळून काम केलं जाईल. जेणेकरुन गरजवंतांना घरं मिळतील, असंही त्या म्हणाल्या. यावेळी सरकारकडून मिशन शक्ती, मिशन वास्तल्य, पोषण २.० लाँच करण्यात आल्या. याच्या माध्यमातून महिला व बालकांच्या योजना कार्यक्षम पद्धतीने पोहचवता येतील. या माध्यमातून २ अंगणवाड्यांचे अद्ययावतीकरण करण्यात येणार आहे. 'हर घर नल से जल' या योजनेतून ५.५ कोटी घरांना पाणीपुरवठा करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यासाठी ६० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती अर्थमंत्र्यांनी दिली.

अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या, लवकरच एलआयसीमध्ये आयपीओ आणला जाईल. याची प्रक्रिया याच आर्थिक वर्षात सुरू होईल. महत्वाचे म्हणजे, एलआयसीच्या आयपीओची चर्चा बऱ्याच दिवसांपासून सुरू आहे. आरोग्य विषयक पायाभूत सुविधा बळकट करणे, लसीकरण कार्यक्रमाला गती देणे आणि साथीच्या रोगाविरुद्ध मोठ्या प्रमाणावर मोहीम सुरू करणे, हे आमचे लक्ष्य आहे. आत्मनिर्भर भारतच्या अनुषंगाने ६० लाख नव्या नोकर्या निर्माण करणे आणि पुढील पाच वर्षाच्या काळात ३० लाख इतर नोकऱ्या अथवा संधी निर्माण करण्याची क्षमता आहे. तसेच खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले जाईल. अर्थसंकल्पात पुढील २५ वर्षांची ब्लू प्रिंट तयार करण्यात आली आहे. पायाभूत सुविधांसाठी २० हजार कोटी रुपये देणार. लॉजिस्टिकचा खर्च कमी करणार. देशाची अर्थव्यवस्था ७ इंजिनच्या सहाय्याने धावेल. अर्थमंत्री सीतारामन म्हणाल्या, सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन दिले जाईल. शेतकऱ्यांकडून विक्रमी खरेदी केली जाईल. शेतकऱ्यांना डिजिटल सेवा देण्याचे काम केले जाईल. २०२२-२३ मध्ये ६० किमी लांबीचे रोपवे तयार केले जातील. भारतातील



गरिबी हटवण्यासाठी प्रयत्न केले जातील. सरकारने एमएसपीद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात २.३७ कोटी रुपये पाठवले आहेत. सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले जाईल. शासनाकडून रासायनिक व कीटकनाशक मुक्त शेतीचा प्रसार करण्यावर भर दिला जाईल. डिजिटल विद्यापीठे तयार केली जातील आणि शाळांमध्येही प्रत्येक वर्गांत स्मार्ट टीव्ही लावला जाईल. तरुणांना स्किल इंडिया मिशनच्या माध्यमाने आणि सरकारी योजनांतर्गत कुशल कामगार बनविण्यासाठी काम केले जाईल. पीएम आवास योजनेंतर्गत ४८ हजार कोटी रुपये खर्चून ८० लाख घरे बांधण्यात येणार आहेत. नव्या घरांसाठी शहरी भागांत अधिक तरतूद केली जाईल आणि ग्रामीण भागासाठीही आधुनिक घरे बांधली जातील. आता पोस्ट ऑफिसमध्ये ऑनलाइन ट्रान्सफरची सुविधाही उपलब्ध होणार असून पोस्ट ऑफिस कोअर बँकिंग सेवेअंतर्गत येईल. ७५ जिल्ह्यांमध्ये डिजिटल बँकिंगची सुविधा सुरू करण्यात येणार आहे. २०२२ पासून पोस्ट ऑफिसमध्ये डिजिटल बँकिंगवर काम केले जाईल. पोस्ट ऑफिसमध्ये एटीएम सुविधाही उपलब्ध होईल. २०२२ मध्ये ५ॠ सेवेची सुरू केली जाईल. हे तंत्रज्ञान भारतात उत्तम रोजगार निर्मिती करेल. देशातील दुर्गम भागांतही सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि सर्व जण डिजिटल जगाशी जोडले जावे, हे आमचे लक्ष्य आहे.

अर्थसंकल्पातील २५ टक्के रक्कम संरक्षण क्षेत्रातील संशोधनासाठी दिली जाणार आहे. देशाच्या सीमांवरील परिस्थिती लक्षात घेत या अर्थसंकल्पात संरक्षणावर अधिक भर देण्यात आला आहे. डिजिटल करन्सी लागू केली जाईल. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया २०२२-२३ पासून डिजिटल चलनाची सुरू करणार आहे. यानंतर डिजिटल करन्सीचा व्यवहारात वापर होणे सुरू होईल. क्रिप्टो करन्सीच्या उत्पन्नावर ३०% कर आकारला जाईल. तसेच, मार्च २०२३ पर्यंत स्टार्टअप्सना प्रोत्साहन दिले जाईल. NPS वर कर सवलत वाढून १४ टक्के करण्यात आली आहे. सौरऊर्जा निर्मितीसाठी अर्थसंकल्पात १९,५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून देशात इलेक्ट्रिक वाहनांसाठी नवीन चार्जिंग स्टेशन्स बसवण्यात येणार आहेत. देशात सौरऊर्जेसाठी सौर पॅनेल आधारित ऊर्जा प्रकल्प विकसित करण्यावर भर दिला जाईल. परदेशातून येणारी यंत्रसामग्री स्वस्त होईल आणि शेतीसाठी आवश्यक असलेली उपकरणेही स्वस्त होतील. कपडे आणि चामड्याच्या वस्तू स्वस्त होतील. हिऱ्यांच्या दागिन्यांवर कस्टम ड्युटी कमी करण्यात आली आहे. तसेच छत्र्यांवरील आयात शुल्कात २० टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे.

**स्वस्त**

- कपडे, चामड्याचा वस्तू
- इलेक्ट्रॉनिक्स वस्तू
- मोबाईल फोन, चार्जर
- हिऱ्याच्या वस्तू, दागिने
- शेतीची अवजारे
- कॅमेरा लेन्सेस स्वस्त होणार
- विदेशातून येणाऱ्या मशिन्स
- चप्पल आणि बुट्स
- इंधन स्वस्त होण्याची शक्यता
- इम्पोर्टेड केमिकल स्वस्त होणार

**महाग**

- छत्र्या महाग होणार
- क्रिप्टो करन्सीमधील गुंतवणूक महाग

## भोजनालयातील सिलेंडरचा स्फोट होवून आग ; बाजूच्या दोन घरांचे मोठे नुकसान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहतीमधील एका भोजनालयात असलेल्या सिलेंडरचे स्फोट होवून लागलेल्या आगीत त्या भोजनालयासह बाजूला असलेल्या दोन घरांचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने कोणतीही जिवीतहानी झाली नाही.

कामोठे वसाहतीमधील सेक्टर ११ येथे असलेल्या स्वस्तिक प्लाझा या इमारतीमध्ये जयंतीलाल यांचे भवानी भोजनालय आहे. सदर ठिकाणी आज सायंकाळी ७ च्या दरम्यान सिलेंडरचे स्फोट झाले व त्या स्फोटामध्ये बाजूच्या घरांना सुद्धा आग लागून त्यांचे मोठे नुकसान झाले. स्फोटाच्या आवाजामुळे आजूबाजूचे सर्व रहिवाशी घराबाहेर



पडल्यामुळे कुठलीही जिवीतहानी झाली नाही. साधारण ४ सिलेंडरचे स्फोट झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. या घटनेची माहिती मिळताच कामोठे पोलीस ठाण्याचे पथक तसेच पनवेल अग्नीशमन दलाचे बंब व कळंबोली अग्नीशमन दलाचे बंब असे ४ ते ५ बंब घटनास्थळी पोहचून त्यांनी अवघ्या १५ ते २० मिनिटात आगीवर नियंत्रण मिळविल्याने आग पसरली नाही. सायंकाळची वेळ असल्याने मोठ्या प्रमाणात या भागात रहदारी असते. त्यामुळे आग पसरली असती तर मोठी जिवीतहानी झाली असती असे येथील रहिवाशांचे म्हणणे आहे.

## उरण तालुक्यातील १२३ अंगणवाड्यात अवघ्या एकच कुपोषित बालकाची नोंद

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात एकात्मिक बालविकास प्रकल्पा अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या अंगणवाडी योजनेत कौतुकास्पद काम सुरू आहे.तालुक्यात ० ते ५ या वयोगटात फक्त एकच कुपोषित बालक असून त्याला योग्य पोषण आहार दिला गेल्याने सध्या त्याचे वजन लक्षणीय वाढत आहे.त्यामुळे तालुक्यात लवकरच कुपोषित बालकांची संख्या शून्यावर येणार असल्याची माहिती प्रकल्पाचे विस्तार अधिकारी किशोर उमटे यांनी दिलीआहे.

उरण तालुक्यात एकात्मिक बालविकास प्रकल्पातर्गत १२३ अंगणवाड्या चालविल्या जातात.या अंगणवाड्यामध्ये ० ते ५ वयोगटातील सुमारे ९३९४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. बालकांच्या आरोग्यासाठी या अंगणवाड्यांमध्ये विशेष काळजी

.../२

## इस्त्राईलच्या राजदूतांनी घेतली आयुक्त गणेश देशमुख यांची भेट



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल मधील इस्त्राइली दफनभूमीचा विकास करावा तसेच त्या अनुषंगाने असणाऱ्या विविध विषयांवरती चर्चा करण्यासाठी आज (१ फेब्रुवारी) इस्त्रायलचे मुंबईतील वाणिज्यदूत कोबी शोशानी आणि इस्त्राईल वाणिज्यदूत यातील विशेष प्रकल्प अधिकारी अनय जोगळेकर आज आयुक्त गणेश देशमुख यांची भेट घेतली.

पनवेलमध्ये अनेक वर्षापासून इस्त्रायली लोकांची वसाहत असून त्यांची दफनभूमी तसेच इतर धार्मिक स्थळे आहेत. त्यांचा विकास महापालिकेने करावा या हेतूने इस्त्रायलचे राजदूत कोबी शोशनी यांनी आयुक्त गणेश देशमुख यांच्याशी चर्चा केली. तसेच पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रस्तावित विविध उपक्रमांची माहिती यावेळी आयुक्तांनी शोशांनी यांना दिली.

## संक्षिप्त...

### आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेसाठीचे अर्ज १६ फेब्रुवारी पासून भरता येणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेचे संभाव्य वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यानुसार ०१ फेब्रुवारी २०२२ पासून पालकांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी कळविण्यात आले होते. तथापि काही अपरिहार्य कारणास्तव आरटीई पोर्टलवर सद-रचे अर्ज ०१ फेब्रुवारी २०२२ ऐवजी बुधवार १६ फेब्रुवारी २०२२ पासून भरता येतील, संबंधितांनी या बदलाची नोंद घेऊन अर्ज दाखल करावेत, असे आवाहन शालेय शिक्षण मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांनी केले आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ कलम १२(१)(सी) नुसार खाजगी विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश स्तरावर २५ टक्के जागा वंचित व दुर्बल घटकातील मुले व मुलींसाठी राखीव ठेवण्याची तरतूद आहे. याबाबत आरटीई पोर्टलवर सविस्तर सूचना यथावकाश देण्यात येतील. पोर्टलवरील वेळोवेळी दिलेल्या सूचनांची सर्व संबंधितांती नोंद घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, असेही शिक्षक संचालक (प्राथमिक) दिनकर टेमकर यांनी याबाबत दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

### युवासेनेच्या दणक्यानंतर मुजोर हॉस्पिटलमधून

## नवजात बालकाला मिळाला डिस्चार्ज; ९ लाख करून घेतले माफ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

युवासेनेच्या दणक्यानंतर खारघरमधील एका हॉस्पिटलमधून नवजात बालकाला डिस्चार्ज मिळवून देण्यात आला आहे. तसेच त्याच्या उपचारासाठी आलेल्या बिलातील ९ लाखसुद्धा हॉस्पिटल प्रशासनाकडून माफ करण्यात आले आहेत.

खारघरमधील मदरहूड हॉस्पिटलमध्ये ५ महिन्यांत जन्मलेले अकाली बाळाचे उपचार गेले चार महिने चालू होते. अकाली (प्रिमॅच्युअर बेबी) बाळ जन्मल्यामुळे इलाज खूप गुंतागुंतीचा होता. रूग्णालयात दाखल करत असताना हॉस्पिटलकडून साधारणपणे १५ लाख खर्च अपेक्षित सांगितला होता. कालांतराने उपचार चालू असताना डॉक्टरांच्या मतानुसार गुंतागुंत वाढल्याने सुमारे २७ लाखाच्या जवळपास बिल बाळाच्या आई वडिलांना झाल्याचे हॉस्पिटलकडून सांगण्यात आले. त्यापैकी रोखरक्कम व इतर काही रक्कम कर्ज काढून १७ लाख रूपये टप्प्या टप्प्याने हॉस्पिटलमध्ये भरले गेले. उर्वरित रक्कम भरण्यासाठी मुलाचे वडील सक्षम नसल्याने मागील २० दिवसांपासुन हॉस्पिटलमधून पैसे भरले नाहीत तर डिस्चार्ज मिळणार नाही असे सांगून बाळाची अडवणुक केली होती. सदर कुटूंबिय हे मूळचे



कर्जत येथील रहिवासी असून ते मुस्लीम कुटुंबीयातील वासिम जालानी हे आहेत. या दाम्पत्याने शिवसेनेच्या स्थानिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून मावळचे खासदार श्रीरंग (आप्पा) बारणे यांच्याकडे तक्रार केली व मदत मागितली असता खासदार बारणे हे अर्थसंकल्पीय अधिवेशनाकरिता दिल्लीला असल्याने सदर प्रकरण हाताळण्याची सूचना खारघर येथील युवासेना उपजिल्हा अधिकारी अवचित राऊत यांना दिली. तातडीने अवचित राऊत यांनी शिवसेना विभागसंघटक रामचंद्र देवरे, विभागप्रमुख उत्तम मोर्बेकर, युवासेना उपतालुका अधिकारी अनिकेत पाटील, युवासैनिक संकेत पाटील, विजय रोकडे, प्रकाश राजपुत, यांना सोबत घेऊन

.../२

युवासेना उपजिल्हा अधिकारी अवचित राऊत यांच्या मातोश्री या आजारपणामुळे मुंबई येथील रूग्णालयात गेल्या ८ दिवसांपासून उपचारार्थ दाखल झाल्या आहेत. त्यामुळे अवचित राऊत हे तिथेच आईच्या सेवेसाठी होते. परंतु जेव्हा या नवजात बालकाची माहिती त्यांना मिळताच ते तातडीने खार-घर येथे येऊन त्यांनी यशस्वीपणे मध्यस्थी करून आईच्या सेवेसाठी पुन्हा ते मुंबई येथे रवाना झाले. यातूनच शिवसैनिक हा काळवेळ न बघता सदैव लोकांच्या सेवेसाठी तैनात असतो हे दिसून आले.

## १३ वर्षीय अल्पवयिन मुलीचे अपहरण करणाऱ्या इसमाच्या ४८ तासात आवळल्या मुसक्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका १३ वर्षीय अल्पवयिन मुलीचे अपहरण करून तिला लपवून ठेवून गुवाहाटी आसाम येथे पळवून नेण्याच्या तयारीत असलेल्या इसमाला पनवेल तालुका पोलिसांच्या सतर्कतेमुळे गज-ाआड करण्यास यश आले आहे.

तालुक्यातील हावरे बिल्डिंग, पडघे, पनवेल, येथून कोणीतरी अज्ञात इसमाने अल्पवयीन मुलगी वय १३ वर्ष हीस फूस लावून अपहरण केले असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल होताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक संजय गळवे, पोलिस उपनिरीक्षक भरत पाटील, पोलिस हवालदार महेश धुमाळ, पोलिस हवालदार सुनिल कुदळे, पोलीस नाईक पंकज चंदीले, पोलिस नाईक प्रकाश मेहेर, महिला पोलिस नाईक आरती लाड यांनी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन कोणताही धागादोरा नसताना कौशल्याने तपास करण्यास सुरवात केली. अपहृत मुलीचे मोबाईलचे सीडीआर प्राप्त करण्यात आले व अवलोकन केले असता एक इसम अपहृत मुलीस सतत कॉल करीत असल्याचे निर्दशनास आले. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठांच्या निर्देशानुसार तात्काळ २ पोलिस पथके नियुक्त केली.एक पथक लोकमान्य टिळक टर्मिनस, कुर्ला रेल्वे स्टेशन, मुंबई.-कल्याण रेल्वे जंक्शन,कल्याण,ठाणे-पनवेल रेल्वे स्टेशन,पनवेल येथे सीसीटीव्ही फुटेज चेक करण्याकरिता पाठविले व दुसऱ्या पथकास मोबाइलचे सीडीआर व गोपनीय माहितीच्या आधारे तपास करण्याकरिता सूचित केले. दरम्यान संशयित आरोपी संजीप बरद-ोलोई याचे सीडीआर प्राप्त झाल्यानंतर संशियत आरोपी संजिप बरदोलोई व अपहरीत मुलगी यांचे सीडीआर एकत्रित

.../२



# आमदार असलो तरी मंत्र्यापेक्षा जास्त काम करणार : आ.रविशेठ पाटील



**दै.रायगड नगरी । पेण**

मी मंत्री आसताना या भागात अनेक विकास कामे केली आता आमदार असलो तरी मंत्र्यापेक्षा जास्त काम करणार आसल्याचे प्रतिपादन आमदार रविशेठ पाटील यांनी खरोशी येथे केले.

पेण तालुक्यातील खरोशी येथील राष्ट्रीय महामार्ग ते खरोशी गाव मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतुन मंजुर झालेल्या रस्त्याच्या डांबरीकरणाचे उदघाटन, केळंबादेवी मंदीराजवळील सभामंडपाचे लोकार्पण, खरोशी धरणवाडी साकवाचे लोकार्पण, खरोशी गावातील अंतर्गतरस्त्याचे भुमीपुजन असे एकुन एक कोटी आठ लाखाच्या विकास कामाचे भुमीपुजन व लोकार्पण आमदार रविशेठ पाटील यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी भाजपचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, जिल्हा चिटणिस वासुदेव म्हात्रे, भाजपचे पेण तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील,पंचायत समिती सदस्या मालती म्हात्रे, पुजा घरत, भाजप तालुकाउपाध्यक्ष महेश घरत, अनंता पाटील,गंगाराम पाटील,सविता पाटीलआदिसह ग्रामस्थ उपस्थित होते.

मी मंत्री आसताना येथील रस्त्याचे काम केले होते परंतु येथील रस्त्याची दुरावस्था झाली आसताना आजपर्यत येथील रस्त्याचे काम झाले नाही परंतु मी आमदार झाल्यावर येथील रस्त्याचे काम होत आहे.येथील शेतकरी भाजी पाला पिकवणारे शेतकरी आहेत त्याच्या भाजीपाला वाहतुकीचा प्रश्न येथील साकवाचे बांधकामामुळे सुटणार आहे. येथील विजेचा प्रश्न सोडविला आहे. येथील शेतकरी भाजीपाला पिकवत असुन येथील नदीवर बंधारा बाधण्यासाठी प्रयत्न करणार आहे. तर या गावातील विकास कामासाठी अतिरिक्त निधी देणार आसल्याचे आमदार रविशेठ पाटील यांनी या वेळी सांगितले.

# पनवेल महापालिकेच्या मालमत्ता करास नागरिकांचा प्रचंड विरोध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगर पालिकेने लावलेला जिझिया मालमत्ता कर रद्द करावा न केल्यास त्या विरोधात आंदोलन केले जाईल असे आज ड सुरेश ठाकूर यांनी पालिका प्रशासनास ठणकावून सांगितले.

आज पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कराच्या विरोधात ड सुरेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनात उप आयुकत पनवेल महापालिका यांच्या सोबत चर्चा झाली.

मालमत्ता कर रद्द करावा नाहीतर सदर कर सिडको कडून वसूल करावा. मनपाचे लावलेले कराचे दर हे क वर्ग महापालिकाचे असून ते चुकीचे आहेत तसेच भूमिपुत्रांना व इतर नागरिकांना गृहनिर्माण संस्थांना सिडको मार्फत वाटपित भुखंड साठ वर्षे भाडे तत्वावर आधारित असून त्याची मालकी ही सिडको कडे असल्याने त्या इमारतींचा कर हा सिडको कडूनवसूल करावा, मालमत्ताकर विरोधात पालिकेस निवेदन सादर लवकरच खारघर ते पनवेल लाँग मार्च चे आयोजन करण्यात येईल असे सांगण्यात आले. आज या शिष्टमंडळात अॅड विजय गडगे, नीलकंठ पाटील, संतोष गायकर, रमाकांत पाटील, श्याम पाटील, मेघनाथ पाटील, विश्वनाथ चौधरी, विनोद लाड आदि मान्यवर उपस्थित होते.

# आरोग्यासाठी स्वार्थी होणे गरजेचे युवा सेलिब्रेटी फिटनेस ट्रेनर तुषार याचे मत

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

आजकालचे दैनंदिन जीवन आणि सध्याची प्रतिकुल परिस्थिती पाहता, असे लक्षात येते की, स्वतःच्या आरोग्यासाठी वेळ द्यावाच लागतो, त्यासाठी स्वार्थी होणेच गरजेचे आहे. असे विचार युवा सेलिब्रिटी फिटनेस ट्रेनर (मुंबई) तुषार रमेश पवार याने व्यक्त केले आहे.

का?..आपण सर्वजण नक्कीच भौतिक गरजांच्या मागे लागलो आहोत, त्यात चुकीचे ही काही नाही. त्यासाठी खूप धडपड ही करत आहोत. परंतु त्यामुळे आरोग्यावरील लक्ष मात्र विचलित झाले आहे, किंबहुना लक्षच नाही. मुंबई पुणे सारख्या शहरात दिवस सुरू कधी होतो आणि कधी संपतो लक्षातच येत नाही. त्यात या लॉकडाऊनची भर, त्यामुळे आपण आपल्या आरोग्याची नासाडी करत आहोत, हे बहुतेकांच्या लक्षातच येत नाही. यासर्वाचे परिणाम आपल्या शरीर स्वास्थ्यावर दिसत आहेत.

अलीकडील काळात वजन वाढणे , लठ्ठपणा, मधुमेह, पित्तदोष, उच्च रक्तदाब, हृदयविकाराचा झटका या सारख्या समस्या वाढत चालल्या आहेत. यासाठी आत्ताच दक्ष होणे गरजेचे आहे. त्यासाठीच स्वार्थी होणे गरजेचे आहे. विशेषतः गृहिणींनी स्वार्थी होणे जास्तच गरजेचे वाटते. त्यावर उपाय काय? १) दिवसातून कमीत कमी तीस मिनिटे व्यायाम करणे आवश्यक.२) व्यायामा मध्ये आवडती गोष्ट करू शकता, जसे की जिम्, सायकलिंग, पोहणे, जॉगिंग, डान्सिंग. ज्यांना यापैकी काहीच आवडत नसेल किंवा जमत नसेल, त्यांनी तीस मिनिटे आवडते गाणे किंवा पॉडकास्ट लावून चालणे ही उत्तम. ३) दिवसभरात जेवढा वेळ सोशल नेट वर्किंग वर घालवतो, त्यातील फक्त तीस मिनिटे शरीराला देणे जरुरीचे नाही का ? ४) आहार सुद्धा पौष्टीक असावा, बाहेरील जंक फूड, सॉफ्ट ड्रिंक, तेलकट पदार्थ शक्य तितके टाळावेत. फळांचे प्रमाण वाढवावे. ५) आजकाल बाजारात पौष्टीक असे बरेचसे पर्याय उपलब्ध असतात. त्यांचा आहारात वापर करावा जसे की वडापाव च्या ऐवजी सँडविच खाऊ शकता, पिझ्झा चा ऐवजी फ्रूट सलाड खाऊ शकता, सॉफ्ट ड्रिंक च्या ऐवजी नारळ पाणी किंवा ताक घेऊ शकता. (कधी कधी जंक फूड खायला सुद्धा हरकत नाही पण समतोल साधा) ६) वेळेवर झोप घ्या, कमीत कमी सात तास झोप आवश्यक. ७) आठवड्यातून एकदा जमल्यास ध्यान-धारणा करा, छंद जोपासा, आवडत्या गोष्टींना ही वेळ द्या.

या सर्व गोष्टी आपल्या दैनंदिन जीवनात अंमलात आणा आणि पहा की फक्त शारीरिकच नव्हे,तर मानसिक प्रकृती सुद्धा स्थिर होईल. या सर्व गोष्टींकडे, तुम्ही निर्बंध म्हणून पाहू नका. या बदलांना जीवनशैलीचा भाग बनवा. येणाऱ्या काळात सगळ्यांना प्रकर्षाने खऱ्या अर्थाने जाणवेल की Health is wealth (आरोग्य हीच खरी संपत्ती). सर्वांनी काळजी घ्या, फिट रहा, निरोगी रहा, आरोग्यासाठी स्वार्थी बना.

# नळ पाणी योजनेस ६ कोटी ५० लाख ९४ हजार ३८८ रुपये

**दै.रायगड नगरी । कर्जत**

आमदार महेंद्र थोरवे यांच्या विशेष प्रयत्नातून जलजीवन मिशन योजने अंतर्गत कर्जत तालुक्यातील कडाव ग्रामपंचायतीस ६ कोटी ५० लाख ९४ हजार ३८८ रुपये किंमतीच्या अंदाजपत्रकास जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. कर्जत तालुक्यातील कडाव ग्रामपंचायतीची वस्तु-स्थिती विचारात घेता नळ पाणीपुरवठा योजना ही ५५ लिटर दरडोई दर दिवशी क्षमतेच्या ५९०५ रुपये दरडोई खर्च असलेल्या ६ कोटी ५० लाख ९४ हजार ३८८ रुपये किमतीच्या नळ पाणीपुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

## कर्जत नगर परिषद

KARJAT MUNICIPAL COUNCIL

ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१

Email : karjatcouncil@gmail.com ऑफिस : ०२१४८-२२२०३३

क्रकनप/भां.वि/१८९/२१-२२ दिनांक : ३१/०१/२०२२

### जाहीर निविदा सूचना

**कर्जत नगरपरिषदेकडून पात्रताधारक व इच्छुक वार्षिक ठेकेदार नेमणूक करणे करिता फेर निविदा सुचना क्र. (२) मागविण्यात येत आहेत.**

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्म फी | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, जयंती-पुण्यतिथी तथा विविध सभा कार्यक्रमांसाठी आवश्यक साहित्य, अल्पोपहार, जेवण, हार, बुके पुरविणे | ५००/- | २०००/- (D.D.भरणे) |

**कामाच्या अटी व शर्ती :-**

**१) निविदा पत्रक विक्रीची तारीख दि.०२/०२/२०२२ ते १०/०२/२०२२ पर्यंत सायं.५.०० पर्यंत असून निविदा स्वीकारण्याचा कालावधी दि.११/०२/२०२२ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत राहील.**

**२) निविदा उघडणेचा कालावधी ११/०१/२०२२ सायं.५.३० वा. किंवा प्रशासकीय सोयीनुसार राहील.**

**सही/-**
**(डॉ.पंकज पाटील)**
**मुख्याधिकारी**
**कर्जत नगरपरिषद, कर्जत**

**सही/-**
**(सुवर्णा केतन जोशी)**
**अध्यक्षा**
**कर्जत नगरपरिषद, कर्जत**

---

अर्जदारांचे वकील : अधिवक्ता जयेश संभाजी म्हसे

### जाहीर नोटीस

कर्जत येथील मा.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

चौ.अर्ज क्र.२२/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता. १७/०३/२०२२

श्री.रवींद्र दत्तात्रेय दरेकर व ४ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, :-

१) सदरील अर्जदार हे कै.सुनंदा दत्तात्रेय दरेकर उर्फ सुलावती दत्तात्रेय दरेकर यांचे कायदेशीर वारस आहेत.

२) अर्जदार क्र.२ यांची पत्नी व अर्जदार क्र.१ व ३ ते ५ यांची आई कै.सुनंदा दत्तात्रेय दरेकर उर्फ सुलावती दत्तात्रेय दरेकर यांचे नावे स्थावर मिळकती आहेत. महाराष्ट्र शासनाने जून २०१५ च्या सुमारास जी.आर.काढून वारस म्हणून नावे नमूद करण्याकरिता दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला असणे आवश्यक आहे असे ठरविले आहे.

३) अर्जदार क्र.२ यांची पत्नी व अर्जदार क्र.१ व ३ ते ५ यांची आई कै.सुनंदा दत्तात्रेय दरेकर उर्फ सुलावती दत्तात्रेय दरेकर या दि.१६ मे १९९९ रोजी मयत झालेल्या आहेत.

४) त्यामुळे कै.सुनंदा दत्तात्रेय दरेकर उर्फ सुलावती दत्तात्रेय दरेकर यांच्या मिळकतीस केवळ अर्जदार हेच वारस आहेत. तसे नाममात्र घोषित (फॉर्मल डिक्लेरेशन) करून मिळण्याकरिता अर्ज या मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. सबब, अर्जदार यांचे वारस हक्कास जर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ही तरहकत आमचेकडे लेखी पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास हे मा.न्यायालय पुरावा घेवून योग्य वाटल्यास अर्जदार यांस वारस दाखला देईल. मागाहून कोणाचीही हरकत असल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

आज दि.०१/०२/२०२२ रोजी आमच्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, कर्जत** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, कर्जत**

---

पांडे साहेब यांच्या कोर्टात

अर्जदारातर्फे वकील : अॅड.आशिष पनवेलकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात

फौ.चौ.अर्ज क्र.५६/२०२२
ने.ता. २१/०२/२०२२

श्री.जसवीर बलजीत सिंह
वय : १८, व्यवसाय : शिक्षण
रा.फ्लॅट नं.बी.९०१ श्री चामुंडा हार्मोनी
सीएचएस प्लॉट नं.६८ ए, ६९, ६९ ए, सेक्टर-१८
कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांची आजी कै.जोगिंदर कौर यांचा मृत्यू दि.१०/०६/२०१४ रोजी राहत्या घरी फ्लॅट नं.बी ९०१ श्री चामुंडा हार्मोनी सीएचएस प्लॉट नं.६८ ए, ६९, ६९ ए, सेक्टर-१८, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू झाला होता.

अर्जदार यांची आजी कै.जोगिंदर कौर यांची मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात अर्ज केला आहे.

सदरहू कै.जोगिंदर कौर या वर नमूद ठिकाणी मयत झाले आहे. या संदर्भात कोणालाही काही सांगायचे असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पनवेल येथील मे.न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून हरकत घ्यावी. तसे न केल्यास न्यायालय अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून योग्य आदेश करेल.

आज दि. रोजी सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

---

मा.श्री.राव साहेब कोर्ट

श्री.विरेंद्र त्रिं. कुळकर्णी
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.२०५९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता. ०९/०३/२०२२

श्री.दिवाकर पांडुरंग कुळकर्णी
वय : ७९ वर्षे, धंदा : निवृत्त
रा.फ्लॅट नं.ए-५०२, निळकंठ गार्डन,
भूखंड क्रं.२९/५, काळण समाज हॉलच्या मागे,
बावन बंगला, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी त्यांना कै.सुधाकर पांडुरंग कुळकर्णी यांचे दि.१९/१२/१९९८ रोजीचे अंतिम मृत्यूपत्राप्रमाणे मिळणाऱ्या खालील वर्णनाच्या मिळकती संदर्भात अर्जदार यांनी सदरचे प्रोबेट दाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**कै.सुधाकर पांडुरंग कुळकर्णी यांचे मालकीच्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-**

**मौजे : नवीन पनवेल (पश्चिम), ता.पनवेल, जि.रायगड येथील सेक्टर ५ मधील सिडको कादंबरी को.ऑप.हौ.सोसायटी मधील भूखंड क्रं.बी/५ पैकी युनिट क्रं.१२, क्षेत्र २४ चौ.मीटर अशा वर्णनाची मिळकत.**

वर नमूद अर्जदार ह्यांनी कै.सुधाकर पांडुरंग कुळकर्णी यांचे दि.१९/१२/१९९८ रोजीचे अंतिम मृत्यूपत्राप्रमाणे मिळणाऱ्या स्थावर व जंगम मिळकतीबाबत कोणतीही हरकत असल्यास व ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.दिवाकर पांडुरंग कुळकर्णी यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.सुधाकर पांडुरंग कुळकर्णी यांचे पश्चात प्रोबेट दाखला मिळण्यास पात्र आहेत, असे सिद्ध झाल्यास त्यांना हे प्रोबेट दाखला मंजूर करेल.

आज दि.०१/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

कोर्ट मा.इंदलकर साहेब

अॅड.जगदीश बी. ठाकूर
अर्जदारतर्फे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी साहेब प्रथम वर्ग यांचे कोर्टात

क्रिमिनल चौकशी अर्ज नं.२३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता. १६/०३/२०२२

श्रीमती.ताईबाई शांताराम पेटकर
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत आदई,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार ही राहणारी मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील रहिवाशी असून अर्जदार हिचे वडील कै.हरी राघो शेळके यांचा मृत्यू दि.१८/०७/१९५७ रोजी मौजे : आदई, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव अनावधानाने सदर मृत्यूची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करण्याचे राहून गेले आहे. अर्जदार हिचे वडील कै. हरी राघो शेळके यांच्या मृत्यूची नोंद कुठेच नाही. तसा दाखला पनवेल महानगरपालिका पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांनी दिलेला आहे. सबब अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंद कायदा १९६९ कलम १३ (३) प्रमाणे मृत्यूची उशिरा नोंद करून मिळण्याबाबत संबंधित पनवेल महानगरपालिका पनवेल, ता.पनवेल यांना योग्य ते आदेश देण्यात यावेत याकरिता अर्जदार सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल करीत आहेत.

वरील अर्जदार हिचे वडील कै.हरी राघो शेळके यांचा मृत्यूचा दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. सदरच्या नोटीसीस मुदतीत हरकत न आल्यास मृत्यूचा दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.०१/०२/२०२२ रोजी कोर्टाच्या सही-शिक्क्याने दिली.

**सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे मॅडम कोर्ट

अर्जदाराचे वकील श्री.विकास एस. पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.८३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता. ०८/०३/२०२२

श्री.जिग्नेश काकुभाई पंड्या
वय : ३७ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.फ्लॅट नं.१०१, पहिला मजला, ए विंग,
निल गॅलेक्सी को.ऑ.हौ.सो.लि.,
प्लॉट नं.१०३, १०४, सेक्टर-८,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांची आई कै.दिव्याबेन काकुभाई पंड्या रा.फ्लॅट नं.१०१, पहिला मजला, ए विंग, निल गॅलेक्सी को.ऑ.हौ.सो.लि., प्लॉट नं.१०३, १०४, सेक्टर-८, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ह्या दि.३१/१०/२०२० रोजी मौजे पॅरामाऊन्ट मेडीकल सर्व्हीसेस प्रा.लि. पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड या हॉस्पिटलमध्ये मयत झाल्या आहेत. कै.दिव्याबेन काकूभाई पंड्या यांचे पती कै.काकुभाई बाळकृष्ण पंड्या हे दि.०८/११/२००६ रोजी मौजे सी-५/२९/१०, सेक्टर-१८, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. अर्जदार हे कै.दिव्याबेन काकुभाई पंड्या यांच्या खालील मिळकतीचा वारस दाखला मिळणेसाठी अर्ज केला तिचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**निवासी सदनिकेचे वर्णन**

| मिळकतीचे नाव | क्षेत्र | रुपये |
|---|---|---|
| **फ्लॅट नं.१०१, पहिला मजला, ए विंग, निल गॅलेक्सी को.ऑ. हौ.सो.लि., प्लॉट नं.१०३, १०४, सेक्टर-८, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड** | **४५.७८० स्क्वेअर मीटर कारपेट एरिया** | **५८,००,०००/-** |

वरील अर्जदार हे कै.दिव्याबेन काकुभाई पंड्या यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.दिव्याबेन काकुभाई पंड्या यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१/२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, माझे अशिल मदन बापू गोंधळी रा.मु.बामाल्ली, पोस्ट दहिसर, तालुका जिल्हा ठाणे ४००६१२ लिहून घेणारे यांनी लिहून देणारे श्रीमती.मुक्ताबाई आनंद उर्फ अनंत ठाकूर राहणार : व्ही.एन.पुराव मार्ग, मुकूंद आंबेडकर नगर, लालडोंगर, चेंबुर, मुंबई यांच्याकडून खालील वर्णन केलेली शेतजमीन विकत घेण्याची ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : बेलोंडाखार, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | १९ | १ | ०-७७-४० पो.ख. ०-०८-३० एकूण क्षेत्र ०-८५-७० | ३.६२ |
| २ | २ | ४ | ०-०७-४० पो.ख. ०-००-२० एकूण क्षेत्र ०-०७-६० | १.१२ |
| ३ | ११५ | २ | ०-४३-५० पो.ख. ०-०६-६० एकूण क्षेत्र ०-५०-१० | १.३७ |
| अविभक्त विक्रीचे एकूण क्षेत्र ०-१५-९३ | | | | |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**अॅड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसा.,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२,**
**खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

---

पृष्ठ क्र.१ वरुन...

## उरण तालुक्यातील १२३ अंगणवाड्यात अवघ्या एकच कुपोषित बालकाची नोंद

घेतली जाते.सध्या एकूण बालकांपैकी ९१७५ बालके ही सर्वसाधारण वजनाची असून २०१ बालके कमी वजनाची आहेत.तीव्र कमी वजनाची १८ बालके असून फक्त एक बालक कुपोषित असल्याची माहिती विस्तार अधिकारी किशोर उमटे यांनी दिली आहे.

या सर्व अंगणवाड्यांमधील मुलांना नियमितपणे पोषण आहाराचे वाटप करण्यात येत असून कमी वजनाच्या बालकांना एनर्जी ड्रिंक्स बरोबरच पोषक पावडरचेही वाटप नियमितपणे केले जात असल्याचे सांगून कुपोषित असणाऱ्या फक्त एका बालकाची योग्य काळजी घेत असल्याने ते बालक सुद्धा लवकरच सुदृढ होईल व तालुक्यातील कुपोषित बालकांची संख्या शून्यावर येईल असे या प्रकल्पाचे विस्तार अधिकारी किशोर उमटे यांनी स्पष्ट केले.

## नवजात बालकाला मिळाला डिस्चार्ज; ९ लाख करून घेतले माफ

मदर हूड हॉस्पिटलला भेट देत तेथील प्रशासन व उपचार करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून खरी परिस्थिती त्यांच्या समोर मांडली व उर्वरित बिल माफ करण्याची विनंती केली. त्यानुसार यशस्वी मध्यस्थी करत उर्वरित असलेल्या बिलापैकी ९ लाख रूपयांचे बिल हॉस्पिटल प्रशासनाकडून कमी करून घेऊन डिस्चार्ज मिळवून दिला. यावेळी बाळाच्या पालकांनी युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे व शिवसेना खासदार श्रीरंग (आप्पा) बारणे सह शिवसेना युवासेना पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

## इसमाच्या ४८ तासात आवळल्या मुसक्या

करून तांत्रिक तपास केला असता त्यामध्ये एक कॉमन कॉलर गुन्ह्याचे दिवशी दोघांचे संपर्कात असल्याचे निष्पन्न झाले. सदर इसमास प्रथम ताब्यात घेऊन अधिक तपास करता त्याने गुवाहाटी,आसाम येथे राहणारा सजीप बरदोलोई (वय-२२) याने अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तीस तोंडरे, तळोजा, पनवेल येथे लपवून ठेवले आहे व उद्या ते गुवाहाटी,आसाम येथे जाणार आहेत असे सांगितले. संशयित आरोपी व अपहरित मुलीचे वापरते मोबाईलचे गुन्हयाच्या दिवशीचे लोकेशन पाहता व प्राप्त माहितीस दुजोरा मिळाल्याने आरोपीस तोंडरे गाव, तळोजा, पनवेल, जि- रायगड येथून ताब्यात घेऊन अपहरीत मुलीची महिला पोलीस अमलदारांकरवी सुरक्षित रित्या अवघ्या ४८ तासांच्या आत सुटका करण्यात आल्याने तिच्या कुटूंबियांनी पनवेल तालुका पोलिसांचे आभार मानले आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## सुधीर मुंबईकर मुख्याध्यापकपदी विराजमान

**दै.रायगड नगरी । उरण**

गेली ३१ वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेले, रायगड जिल्हा परिषदेचे आदर्श शिक्षक सुधीर शांताराम मुंबईकर यांची जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे न्यू इंग्लिश स्कुल मोरा येथील माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक पदी निवड करण्यात आली आहे. या अगोदर ते त्याच शाळेत २० वर्षे वरिष्ठ शिक्षक म्हणून काम करीत होते. त्यांचे कार्य पाहुन त्यांची हि निवड झाली आहे. शिक्षक सुधीर मुंबईकर उरण तालुक्यातील आदर्श शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आहेत. अनेक समाजोपयोगी उपक्रमात त्यांचा सहभाग असतो. माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापक पदी निवड झाल्याने शिक्षक सुधीर मुंबईकर यांच्यावर सर्व स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. माजी नगराध्यक्ष तथा उद्योजक जे एम म्हात्रे,जे एम चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष प्रितम म्हात्रे,सचिव –जयवंत मढवी,चेअरमन –दिलीप मुंबईकर, चेअरमन पी एम कोळी,प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक साईनाथ गावंड, इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका –संध्या ठाकूर,पनवेल शेकाप तालुका चिटणीस –शंकरशेठ म्हात्रे,शिक्षक सुरेश गावंड,विलास मुंबईकर, अनिल मुंबईकर, दिपक पाटील, वैभव खरिवले,सत्यवान कडू, सुदेश पाटील,सर्व शिक्षक, सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी आदी मान्यवरांनी नवनियुक्त मुख्याध्यापक सुधीर मुंबईकर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# ओव्हरलोड वाहनांवर कारवाई करण्याची शिवसेना अवजड वाहतूक सेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । खोपोली**

पेण उप-प्रादेशिक कार्यालयांतर्गत मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड मालाची वाहतूक केली जात आहे. क्षमतेपेक्षा जास्त माल वाहतूक सरार्सपणे सुरु आहे. त्यामुळे प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या वाहतूकदारांवर एक प्रकारे अन्याय होत आहे. तरी ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना अवजड वाहतूक सेना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष इंद्रजीत बल यांच्या मार्गदर्शनाखाली पेण उप-प्रादेशिक वाहतूक अधिकारी यांच्याकडे शिवसेना अवजड वाहतूक सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पेण उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या परिसरात मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड मालाची वाहतूक केली जात आहे. क्षमतेपेक्षा जास्त माल वाहतूक सर्रासपणे सुरु आहे. त्यामुळे प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या वाहतूकदारांवर एक प्रकारे अन्याय होत आहे. तरी ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई होणे गरजेचे आहे, पण पेण उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचा वरदहस्त असल्याने अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वाहतूक सुरु आहे. याचा परिणाम शासनाच्या महसुलावर होत आहे. दलालांच्या मार्फत कोट्यावधी रुपयांची हप्ते वसुली सुरु असून एक प्रकारे भ्रष्टाचाराचे कुरण पेण उपप्रादेशिक परिवहन कार्यालय झाले आहे. तसेच ओव्हरलोड माल वाहतुकीमुळे रस्त्यांची दुरावस्था होत आहे. त्याचबरोबर रहदारीला अडथळा निर्माण होत आहे. या व्यतिरिक्त वाहतूक कोंडी आणि अपघाताला निमंत्रण दिले जात आहे.

एकीकडे अपघात कमी व्हावे, त्या अनुषंगाने परिवहन विभाग प्रयत्न करीत असताना दुसरीकडे हप्तेबाजी करून ओव्हरलोड माल वाहतुकीला अभय दिला जात असल्याची वस्तुस्थिती आहे. या संदर्भात आपल्या कार्यालयाकडून येत्या पंधरा दिवसांमध्ये संबंधित वाहनांवर योग्य ती कारवाई व्हावी ही माफक अपेक्षा आहे. अन्यथा पेण उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाविरोधात आंदोलनाचा पवित्रा घेतला जाईल. त्याचबरोबर परिवहन मंत्रालयाकडे दाद मागितली जाईल, असा इशारा शिवसेना अवजड वाहतूक सेना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष इंद्रजीत बल यांनी दिला आहे. विविध मागण्यांचे निवेदन ए. आर.आरटीओ महेश देवकते, महादेव सूर्यवंशी, अनिस बागवान यांना देण्यात आले. यावेळी शिवसेना अवजड वाहतूक सेना महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष संदीप अंकुश मोरे (बाबू), महाराष्ट्र राज्य सचिव नरेश भाई चाळके, महाराष्ट्र राज्य उपसचिव अल्ताफ जावेद मन्सूरी, रायगड जिल्हाध्यक्ष दिपक रामचंद्र निकम, रायगड जिल्हा उपाध्यक्ष उमर सिद्दिकी, रायगड जिल्हा उपाध्यक्ष विजय पाटील, पेण तालुका अध्यक्ष राहुल पाटील, उरण तालुका अध्यक्ष चेतन म्हात्रे, पेण युवा सेना अधिकारी आनंद पाटील, अतिश धामणकर आदी उपस्थित होते.

# ऑल इंडिया सिफेरर्स अँड जनरल वर्कर्स युनियनच्या युनिटचा शुभारंभ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ऑल इंडिया सिफेरर्स अँड जनरल वर्कर्स युनियनच्या नवी मुंबई यूनिटचा शुभारंभ यूनियन अध्यक्ष संजय वासुदेव पवार यांनी आज श्रीफळ वाढवून केला. डीन शिपिंग अँड ऑफशोर मॅनेजमेंट चे कामगार आज यूनियन मध्ये सामील झाले आणि ११० कामगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला.

यूनिटचे धोरण स्पष्ट करताना यूनियन अध्यक्षांनी सांगितले की बेरोजगार हाताना काम हे प्रमुख कारण आणि त्याची सुरक्षा, तसेच कामगार हक्कांचे कुठे ही उल्लंघन होवू नये. वैश्विक संकटातून बाहेर पडत असताना रोजगार उप-लब्ध करून देणे. या प्रसंगी यूनियन कार्याध्यक्ष अभिजीत सांगळे, खजिनदार शितल मोरे, उपाध्यक्ष सुनील भोसले, उपाध्यक्ष सुरेश चौधरी, सरचिटणीस बंटी राणे, संघटक शमिका गवळी, संयोजिक स्वाती पाटील, नवी मुंबई पदाधिकारी रोशन कोळी, अक्षय कोळी, तुषार डिकुळे आणि यूनियन चे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



# रायगड जिल्हा बँकेत श्री सत्यनारायण पूजा संपन्न

**दै.रायगड नगरी । तळा**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तळा शाखेत प्रतीवर्षा प्रमाणे २५जाने. ते ३१ जाने. ठेव वाढ सप्ताहाचे खास आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने ३१ जाने रोजी श्रीसत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले होते. पुजेचा मान सौ. श्री अविनाश नाक्ती सपत्निक यांच्या हस्ते करण्यात आली. रायगड बँक सहकारी क्षेत्रातील अग्रगण्य बँक समजली जात असून सहकार महर्षी पुरस्कार प्राप्त रायगडातील नव्हे तर महाराष्ट्रातील एकमेव बँक आहे.

सदर बँकेला ६० वर्षे झाली असून ठेवी व कर्जाचा वाढता आलेख आहे. ३१ जानेवारी २२या कालावधीत ठेवीचे उद्दिष्ट २० कोटी असून कर्ज १५ कोटी असून ३५ कोटी एकत्रित व्यवसाय आहे.एन पी ए ०% आहे. महीला बचत गटाच्या माध्यमातून कर्ज वितरण करून महीला सबळीकरणाला उंचावण्यात मदत करीत आहे तसेच शासकीय सेवेतील नोकरदारांना हप्ता कर्ज, घरतारण, जमीन तारण, वस्त ूतारण, सोने तारण घर बांधणी कर्ज वितरीत करीत असल्याने ग्राहकांचा या बँकेकडे आकर्षित होत आहेत. सदर कार्यक्रमात ठेवीदार खातेदारांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच कोविड काळात उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या आरोग्य सेविका पवार व गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी संचालक ज्ञानेश्वर भोईर, माजी संचालक गोविंदशेट भोईर, कानू विचारे, मंहमद परदेशी, ॲड.चव्हाण, हॉटेल व्यवसायीक दिपक भौड, डॉ.वडके, नवनिर्वाचित नगरसेवक चंद्रकांत रोडे, चंद्रकांत भोरावकर सिराज खाचे, शाखा व्यवस्थापक प्रमोद दळवी, बँक निरीक्षक उल्हास उपाध्ये, कॅशिअर धवल टिळक, अकाउंटंट नंदकुमार शितोळे, कलेक्टीग एजंट, शिपाई उपस्थित होते.

# शिवमुद्रा मित्र मंडळ यांच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील शिवमुद्रा मित्र मंडळ गावठाण यांच्या वतीने प्रजासत्ताक दिन सोहळ्याचे औचित्य साधून सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले.

गावातील लहान मुले व तरूण-तरुणी यांच्या कलागुणांना वाव मिळवण्यासाठी व त्यांच्यातील सुप्त कलागुणांना चालना मिळवण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी सैनिक विशाल खांडेकर, युवा सामाजिक कार्यकर्ते महेश तुपकर, भारतीय युवक अपंग कबड्डी स्पर्धेत निवड झालेले अक्षय निकम आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी गावठाण येथील बालकलाकार व तरूण-तरुणी यांनी मराठी, हिंदी सुपरहिट गीतांवर आपली न्रुत्य सादर करून तसेच छोट्या मोठ्या नाट्यछटा सादर करून उपस्थित रसिक प्रेक्षकांची वाहवा मिळविली. याच कार्यक्रमात युवा सामाजिक कार्यकर्ते महेश तुपकर यांनी मंडळास कोडियमची भेट दिल्याबद्दल त्यांच्या या सहकार्याबद्दल मंडळाकडून विशेष असे आभार व्यक्त करण्यात आले.

# म्हसळा नगरपंचायत काँग्रेस -शिवसेना गटनेते पदी अनिकेत पानसरे यांची निवड

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

नुकत्याच पार पडलेल्या म्हसळा नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेस-शिवसेनेची युती होती. या युतीने पक्षाने १७ पैकी ०४ जागा जिंकून विरोधी पक्ष मजबूत केला. युतीच्या वरिष्ठाच्या मार्गदर्शनुसार दिनांक ३१ जानेवारी २०२२ रोजी सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांची बैठक झाली त्यामध्ये युतीच्या गटनेते पदी तरुण तडफदार तथा म्हसळा शहर प्रमुख अनिकेत (मुन्ना )पानसरे यांची एकमताने निवड करण्यात आली.

म्हसळ्यातील एक संयमी, शांत आणि अष्टपैलू नेतृत्व त्याचप्रमाणे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनुभवी म्हणून अनिकेत पानसरे यांची चांगली ओळख आहे. गटनेते पदी निवड झाल्यावर त्यांनी आमच्या प्रतिनिधिशी बोलताना सांगितले कि युतीच्या माध्यमातून आम्ही हि निवडणूक लढलो मात्र काही बाबतीत आम्ही कमी पडल्याने अपेक्षित यश मिळउ शकलो नाही. आमचे काही उमेदवार अगदी थोडक्या मताने अपयशी ठरले. एक उमेदवार तर फक्त एका मताने अपयशी ठरला. महाड पोलादपूर चे आमदार भरतशेठ गोगावले यांनी आपला वेळात वेळ काढून प्रचारात सहभागी होऊन आमची ताकत वाढविण्याचा निश्चित पणे प्रयत्न केला असे सांगून काँग्रेस च्या कार्यकर्त्यांनीही चांगल्या प्रकारे सहकार्य केल्याचे गटनेते अनिकेत पानसरे यांनी सांगितले.

---

प्रोसेस जमा रु.१००/- वकील : रितेश सोनटक्के

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर पनवेल यांच्या न्यायालयात

चौ.अर्ज क्र.१००/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता. २३/०३/२०२२

१) श्री.महेश गणपत खांबे
२) महेंद्र गणपत खांबे तर्फे वारस
अ) कविता महेंद्र खांबे
ब) केतकी महेंद्र खांबे
क) गौरव महेंद्र खांबे
ड) मानसी महेंद्र खांबे
सर्व रा.प्लॉट नं.२, रोड नं.१४,
सावित्री निवास, सेक्टर १, नवीन पनवेल-४१०२०६ अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मयत कै. गणपत लक्ष्मण खांबे रा.घर नं.प्लॉट नं.२, रोड नं.१४, सावित्री निवास, सेक्टर १, नवीन पनवेल-४१०२०६, ता.पनवेल, जि.रायगड यांचे दि.०६/१०/१९८८ रोजी पनवेल येथे निधन झाले. सदर मयताचे नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**प्लॉट नं.२, रोड नं.१४, क्षेत्रफळ ११२.५ चौ.मी., सेक्टर १, नवीन पनवेल-४१०२०६ (अंदाजे किंमत रु.६,१२५/-)**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारसदाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१/२/२०२२ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मा.राव साहेब
वकील मनोज वारंगे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१९११/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता. ०२/०३/२०२२

1) VIJAY KUMAR
2) PIYUSH KUMAR
Both are residing at-sai heritage
bunglow complex plot no.28,
near devpada road vanjarpada,
English medium school Nerul,
Tal-Panvel, Dist-Raigad APPLICANT

अर्जदार क्र.१ यांची पत्नी आणि अर्जदार क्र.२ यांची आई मयत कै. GEETESHWARI राहणार साई हेरिटेज बंगलो कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.२८, नियर देवपाडा रोड वंजारपाडा, इंग्लिश मेडीअम स्कूल नेरळ, ता.पनवेल, जि.रायगड यांचे दि.१०/१०/२०२१ रोजी एस.डी.एच. पनवेल हॉस्पिटल, पनवेल येथे निधन झाले आणि सदर मयताचे नावे असलेली स्थावर मिळकत खालीलप्रमाणे :-

**SCHEDULE OF PROPERTY**

Flat No.701, Seventh Floor, Blacksmith Park-I,
Sonal Co-Opeative Housing Society,
Admesuring about 980 Sq.ft., Build up,
Plot No.12, Sector No.16, New Panvel, Dist-Raigad.
Valued at Rs.14,63,040/-

Bungalow No.28, admeasuring about 92.90 sq.mtrs. approx.
super built up area, Sai Heritage Bungalow Complex,
free hold land constructed on being Plot No.28,
admeasuring about 464.51 sq. mtrs.
Approx. situate at Survey No.38, Hissa No.7, 8,
Village Vanjarpada, Taluka Karjat, District Raigad, Maharashtra
Valued at Rs.10,00,000/-
Total Valued at Rs.24,63,040/-

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून वारसदाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०१/०२/२२ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

अर्जदाराचे वकील
ॲड.मेहबुब गै. पटेल
ॲड.मनोज म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.६४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता. १९/०३/२०२२

१) श्रीमती.नेमा महेंद्र प्रजापती
उर्फ नेमा मान भावती
२) कु.प्रिन्स महेंद्र प्रजापती
३) कु.अमृता महेंद्र प्रजापती
४) कु.सुनिता महेंद्र प्रजापती
५) किसमती हरिद्वार प्रजापती
सर्व रा.भुसौला अदई, शिवपतीनगर,
सिद्धार्थनगर, उत्तरप्रदेश-२७२२०६
सध्या रा.सी-१/१०१, ग्रीनवुड इस्टेट फेज-१
को.ऑप.हौ.सोसा., स.नं.१०/४, १०/५,
११/३, १२/२, १३/३, हेदुटणे, कानपोली,
ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार नं.१ यांचे पती, नं.२ ते ४ यांचे वडील व नं.५ यांचा मुलगा कै.महेंद्र हरिद्वार प्रजापती हे दि.१९/०५/२०२१ रोजी मयत झाले असून कै.महेंद्र हरिद्वार प्रजापती यांच्या नावाने मौजे : हेदुटणे, ता.पनवेल, जि.रायगड पनवेल येथील महानगरपालिका हद्दीत खालील वर्णनाची सदनिका असून सदर सदनिकेचे कै.महेंद्र हरिद्वार प्रजापती हे रितसर मालक आहेत.

**सदनिकेचे वर्णन**
**मौजे : हेदुटणे, ता.पनवेल, जि.रायगड**
**फ्लॅट (सदनिका) क्र.१०१, सी विंग, ग्रीनवुड इस्टेट फेज-१ को.ऑप.हौ. सोसा., पहिला मजला, स.नं.१०/४, १०/५, ११/३, १२/२, १३/३, मौजे : हेदुटणे, एम.डी.आर.६, तळोजा एमआयडीसी, ता.पनवेल, जि.रायगड क्षेत्र १९.५०९ चौ.मीटर कारपेट + २.३२३ चौ.मी. बाल्कनी**

येणेप्रमाणे सदनिकेचे वर्णन असून, सदरहू सदनिकेच्या अनुषंगाने कै.महेंद्र हरिद्वार प्रजापती यांचा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.महेंद्र हरिद्वार प्रजापती यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारांचे हक्काबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा वारसदाखला देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार जर कै.महेंद्र हरिद्वार प्रजापती यांचे वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०१/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

श्री.मुजावर सो

प्रो.जमा.५०/- अर्जदार तर्फे वकील
ॲड.समीर एस. शेख
ॲड.समीरा के. शेख

## जाहीर नोटीस

मे.दिवाणी न्यायाधिश साहेब वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.९८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता. १६/०३/२०२२

१) श्रीमती.शानुर करीम शेख
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.जावेद करीम शेख
वय : २९ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.रफिक करीम शेख
वय : २८ वर्षे, धंदा : शिक्षण
४) सौ.समीरा करीम शेख उर्फ
समीरा शोहेब तांबोळी
वय : २६ वर्षे, धंदा : वकीली
५) कु.मुस्कान करीम शेख
वय : २२ वर्षे, धंदा : शिक्षण
सर्व रा.२०४, ग्रीन पार्क, सेक्टर-८ ई,
प्लॉट नं.१३, कळंबोली-४१०२१८,
ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.करीम फकरुद्दीन शेख हे दि.२९/०४/२०१७ रोजी मु.भिगवण, ता.इंदापूर, जि.पुणे येथे मयत झालेले आहे. तसेच त्यांची आई कै.फातीमा फकरुद्दीन शेख हे दि.३०/०८/२००३ रोजी मु.मार्डी, ता.सोलापूर, जि.सोलापूर येथे राहत्या घरी मयत झाल्या आहेत.

ना.कोर्टाच्या स्थळसिमेंत व अधिकार क्षेत्रात, मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिडको यांनी वाटप केलेली खालील वर्णनाची नमूद केलेली मिळकत कै.करीम फकरुद्दीन शेख यांच्या मालकी हक्कात ताबेकब्जात, उपभोगात होती / आहे.

**सदनिका / फ्लॅट मिळकतीचे वर्णन**

**फ्लॅट नं.बी-१, प्लॉट नं.१३, सेक्टर-१, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई येथील सना को.ऑप.हौसिंग सोसायटी लि., मधील**

| फ्लॅट नं. | मजला | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|
| ०१ | तळमजला | ३६१ |

अशा वर्णनाच्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

अर्जदार हे कै.करीम फकरुद्दीन शेख ह्यांचे निधनानंतर त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सार कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्या ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.०१/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मा.गोडसे मॅडम

प्रो.जमा.६-२५ अर्जदाराचे वकील
ॲड.विजय गडगे
ॲड.सागर गोंधळी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो.यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.५१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता. ०८/०३/२०२२

सौ.उर्मिला रमेश ठाकूर
पुर्वाश्रमीचे नाव कुमारी उर्मिला भगवान म्हात्रे
वय : ६५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.फ्लॅट नं.२, शिवम सी.एच.एस.,
प्लॉट नं.९९/१००, जी.के.मार्ग, गणपती तलाव,
सेक्टर १९, कोपर खैरणे, नवी मुंबई, जि.ठाणे अर्जदार

ज्याअर्थी कै.भगवान शालिक म्हात्रे हे दि.१२/११/२०२० रोजी मौजे ए/००४, रिद्धी सिद्धी सोसायटी, पायोनिअर सोसायटी जवळ, पनवेल (मनपा), ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांचे राहत्या घरी मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची घर मिळकत व संपादीत मिळकती आहेत.

**घर मिळकतीचे वर्णन**
**घर नं.३४, इमारत क्रं. V15Z1003387, मालमत्ता क्रं.१, संकिता क्र.PNVL0341840, पा. क्र. ४६०४, नोड-सेक्टर-PMC-१५, क्षेत्र .... चौ.मी., मौजे धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड, पनवेल-४१०२०६**

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्रं. | यु.के.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | पनवेल-३७७ | ५५१ | ० | ०-७१-१ |
| २ | पनवेल-४६१ | ५५० | २ | ०-१७-७ |
| ३ | पनवेल-३१९ | ७०४ | ३ | ०-४६-३ |
| ४ | | ५५० | ६ | ०-२३-३ |
| ५ | | ५५४ | ४ | ०-४२-५ |
| ६ | | ७९९ | ६ | ०-४-० |
| ७ | | ५५० | ३ | ०-२९-० |
| ८ | | ७९९ | ३ | ०-८-३ |
| ९ | | ५९१ | २ | ०-३१-४ |
| १० | | ५२८ | २ | ०-१२-९ |
| ११ | | ५७० | ३ | ०-१६-२ |
| १२ | | ५७० | ४ | ०-१७-३ |

मयत हजराबीबी उर्फ हजराबी अ.गफुर तांबडे हिचे मृत्यूपश्चात तीस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार ना-हीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ३१/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## डॉ.सौ अदिती भागवत यांच्या सतर्कतेमुळे झाडाला मिळाले जीवदान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहराजवळ असलेल्या एका भेंडीच्या झाडाला आज सकाळी अचानकपणे आग लागली होती. परंतु तेथून जात असलेल्या डॉ.सौ अदिती भागवत यांनी ते झाड पेटलेले बघून ताबडतोप अग्निशमन दलाला फोन केल्याने घटनास्थळी अग्निशमन दलाचे बंब पोचून त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवल्याने त्या झाडाला जीवदान मिळाले आहे. शहराजवळील पंचमुखी हनुमान मंदीराजवळील भारत हॉटेलच्या समोर असलेल्या एका भेंडीच्या झाडाला आज सकाळी, दि. १ फेब्रू. २०२२ रोजी, आग लागली होती. यावेळी एक सतर्क नागरीक डॉ.सौ अदिती भागवत ह्या तेथून जात असताना त्यांनी ते झाड पेटलेले बघून ताबडतोप अग्नीशमन दलाला फोन केला, दरम्यान काही इतर सतर्क नागरिकही त्यांच्या परीने बाटलीतील पाणी ओतून आग विझवण्याचा प्रयत्न करत होते, पण आग भडकू लागली व एक जीवंत हिरवेगार झाड असहाय्यपणे आगीच्या भक्षस्थानी पडत होते. अग्नीशमन दल वेळेवर पोहोचले व त्यांनी सत्वर पाण्याचे फवारे मारून सदर आग विझवली.

## शिवचरित्रातील प्रसंग जीवन जगताना प्रेरणादायीच : प्रशांत देशमुख

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

छत्रपती शिवाजी महाराजांची विविध लेखकांनी लिहिलेली चरित्र जवळपास सर्व इतिहास सर्वश्रुत असल्याने सारखीच वाटतात. मात्र, शिवचरित्रातून काय बोध घ्यावा, याबाबत प्रत्येकाची भुमिका संभ्रमावस्थेतील असते. आयुष्यातील कोणत्या कठीण प्रसंगामध्ये कोणत्या प्रसंगातून प्रेरणा घ्यावी. याबाबतचे मार्गदर्शन जय शिवराय या पुस्तकातून घडते, असे मत शिवव्याख्याते व जय शिवराय पुस्तकाचे लेखक प्रशांत देशमुख यांनी व्यक्त केले. पोलादपूर तालुक्यातील कापडे बुद्रुक येथील हॉटेल आर्याज किचनमध्ये आयोजित शिवव्याख्यानाच्या कार्यक्रमप्रसंगी प्रशांत देशमुख बोलत होते. याप्रसंगी व्यासपिठावर हॉटेलव्यावसायिक व कापडे बुद्रुक ग्रुपग्रामपंचायतीचे माजी सरपंच अजय सलागरे उपस्थित होते. यावेळी डॉ.रवींद्र सोमोशी, पोल-ादपूर पंचायत समितीचे उपसभापती शैलेश सलागरे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे रायगड जिल्हा अध्यक्ष शैलेश पालकर, सेवानिवृत्त नायब तहसिलदार सुभाष जगदाळे, शिक्षण सेवानिवृत्त सुरेंद्र जाधव, तसेच दिवंगत माध्यमिक शिक्षक उदय शिंगटे यांची पुस्तके प्रकाशित करणाऱ्या त्यांच्या पत्नी श्रीमती सुप्रिया उदय शिंगटे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

# ब्रिटिशकालीन तलाव भरला पाणथळीने ; नेरळ ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । कर्जत**

नेरळ ग्रामपंचायतीमधील गणेश घाट म्हणून ओळखला जाणारा ब्रिटिशकालीन तलाव असून या तलावाकडे नेरळकर पर्यटनाच्या द्रृष्टीने पहात असतात. मात्र गणेश उत्सवानंतर या तलावाला पाणथळी वेलीनी वेढा दिला आहे. या वेलीनी संपूर्ण धरणाचे क्षेत्र आपल्या बाहुपाशात आणले आहे. मात्र नेरळ ग्रामपंचायतीचे या तलावातील वेलीकडे लक्ष नाही आणि त्यामुळे स्वच्छ धरण आता विद्रुप वाटू लागले.



कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायतीकडून आयोजित केला जाणारा गणेश विसर्जन सोहळा गणेश घाट आणि ब्रिटीश कालीन तलावावर मोठ्या थाटामाटात केला जातो. त्याच धरणा-तील पाणी शोधण्याची वेळ नेरळच्या रहिवासी यांच्यावर आली आहे. कारण नेरळ गावातील लोक सायंकाळी विरंगुळा म्हणून ज्या धरणावर सध्या फिरायला जातात त्यांना त्या धरणाच्या पाण्यावर हिरवळ तरंगलेली दिसून येत आहे ती हिरवळ नसून पाणी खराब करणारे आणि भराभर वाढणारी वेल आहे पाणथळी वेलीने नेरळ मधील धरणाला विळखा घातला आहे. त्यामुळे हा परिसर पूर्णपणे विद्रूप झालेला दिसून येत आहे.

जानेवारी महिन्यात या धरणातील पाणी आटून जाते. मात्र यावर्षी डिसेंबर महिन्यात झालेल्या अवकाळी पंरतु दिवसभर पडलेल्या पावसाच्या पाण्यात धरण पूर्ण जोमाने भरून वाहत होते. त्यानंतर मागील १५ दिवसात धरणाच्या पाण्यावर पाणथळी वेलीचा शिरकाव झाला आणि आज संपूर्ण धरण पाणथळीनी व्यापून टाकले आहे.

याच धरणाच्या दोन मिनिटांच्या अंतरावर नेरळ ग्रामपंचायतचे कार्यालय आहे त्या ठिकाणी बसणारे लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायत कर्मचारी हे याच धरणाच्या आजूबाजूने दररोज ये जा करीत असतात. त्यामुळे धरण व्यापणाऱ्या वेली नेरळ ग्रामपंचायतीला दिसत नाहीत काय ? हा प्रश्न नेरळ मधील जनतेला सायंकाळी धरणावर गेल्यानंतर सतावत आहे.

## क्रीडा संकुलातील गैरसोई बाबत आ.अनिकेत तटकरे यांनी घेतली पेणच्या अधिकाऱ्यांची झाडाझडती



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील क्रीडा संकुलात अनेक गैरसोई आहेत. तेथे अनेक गैरप्रकार चालत असल्याच्या तक्रारींचा पाढा राष्ट्रवादी उपशहर प्रमुख विशाल बाफना यांनी आमदार अनिकेत तटकरे यांच्याकडे वाचला. त्यांनी त्वरित संबंधित अधिकाऱ्यांना बोल-ावून क्रीडा संकुलाची पाहणी करून याबाबत माहिती घेऊन संबंधित अधिकाऱ्याची झाडाझडती घेतली.

क्रीडासंकुलात अनेक गैरप्रकार चालत असल्याबाबत विचारणा केली असता संबंधित अधिकाऱ्यांनी आता सध्या प्रकार बंद असल्याचे एक प्रकारे कबुली जबाब दिला. या क्रीडासंकुलात फी भरून लाभ घेतला जात आहे. येणारी फी व शासनाकडून येणारा अनुदान याचा वापर योग्य प्रकारे झाला असता तर क्रीडा संकुलाचे अशी अवस्था झाली नसती.

क्रीडा संकुलाची दुरवस्था पाहता त्याच्या दुरुस्तीसाठी जो काही निधी लागेल तो सांगा आम्ही निधी देऊ. अशी ग्वाही आमदार अनिकेत तटकरे यांनी यावेळी दिली.

यावेळी अनिकेत तटकरे यांच्यासह पेण राष्ट्रवादी पेण शहर प्रमुख जितेंद्र ठाकूर, उपशहर प्रमुख विशाल बाफना, सागर हजारे, झेन नाईक व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## कर्जतमध्ये रामशेठ ठाकूर यांची भाजप कार्यालयाला भेट

**दै.रायगड नगरी । कर्जत**

रायगड लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्याकडून कर्जत तालुक्यातील भारतीय जनता पक्षाच्या आढावा घेण्याचा प्रयत्न सुरु आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाराताईंचे जनता पक्षाच्या अपेक्षित यश मिळावे यासाठी रामशेठ ठाकूर यांच्या आढावा घेतला जात असून त्या दौऱ्यात ठाकूर यांनी कर्जत शहरातील भाजपच्या कार्यालयाला भेट दिली.

माजी खासदार आणि भारतीय जनता पक्षाचे राज्य खजिनदार रामशेठ ठाकूर आणि वाय टी देशमुख यांनी कर्जत शहरातील भाजप किसां मोर्चाचे सचिव सुनील गोगटे यांच्या जनसंपर्क कार्यलायाला भेट दिली. त्यावेळी ठाकूर यांनी भाजप कार्यकर्त्यांबरोबर देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मन की बात कार्यक्रम बघितला.त्यावेळी त्यांनी उपस्थितीत कार्यकर्त्यांबरोबर चर्चा केली. पक्ष संघटन मजबुत कर्णयसाठी कोणत्याही वेळी मदतीची अपेक्षा केल्यास आपण कार्यकर्त्यांसोबत असू असे आश्वासन ठाकूर यांनी दिली.याप्रसंगी भारतीय जनता पक्षाचे कर्जत तालुका सरचिटणीस संजय कराळे, भाजप कर्जत शहर शहर उपाध्यक्ष समीर घरलुटे, युवा मोर्चा शहर अध्यक्ष मयूर शितोळे, सावेळे जिल्ह्या परिषद अध्यक्ष अंकुश मुने, युवा मोर्चा चिटणीस सर्वेश गोगटे, बुथ प्रमुख सागर खडे सुनिल पाटील, विद्यार्थी आघाडी अध्यक्ष अभिषेक तिवारी, साऊथ इंडियन सेलचे राव, दिनेश गणेगा यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



## सुधागड-पालीच्या तहसीलदारांची बदली थांबवण्यासाठी आदिवासी बांधवांचे जिल्हाधिकाऱ्यांना साकडे

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यात आदिवासी बांधवांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण यो-गदान देणारे तसेच विविध समाजोपयोगी उपक्रम राबविणारे तहसीलदार दिलीप रायण्णावार यांची आगामी काळात होणारी प्रशासकीय बदली थांबून ते सुधागड तालुक्यातच राहावेत यासाठी सुधागड तालुक्यातील आदिवासी बांधवांनी नुकतेच रायगड जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.



या निवेदनात म्हटले आहे की सुधागड तालुक्यात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात आहे. गेले तीन वर्ष तालुक्याचा सर्वांगीण विकास तहसीलदारांनी केला आहे. आदिवासी बांधव व सर्वसामान्यांना तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयांची दारे उघडी करून बऱ्याचशा योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यात त्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. प्रशासकीय कार्यालयात जाण्यासाठी घाबरणारा ठाकूर व कातकरी समाज तहसीलदारांमुळे सर्व शासकीय कार्यालयात निसंकोच जाऊ लागला आहे. आणि त्यांची कामे देखील सहजतेने होत आहेत. आदिवासी समाजाचे जीवनमान उंचावण्यासाठी तहसीलदारांनी बरेचसे उपक्रम हाती घेतले आहेत.

वेगवेगळ्या संस्थांचा सहभाग घेऊन तालुक्याचा विकास केला आहे. त्यांनी हाती घेतलेले उपक्रम पूर्णत्वास येण्यासाठी व सातत्याने सुरू राहण्यासाठी तहसीलदार या तालुक्यात राहणे गरजेचे आहे. असे म्हणणे कातकरी व ठाकूर समाजाचे अध्यक्ष व सर्व आदिवासी बांधवांचे आहे. निवेदन देतेवेळी कातकरी समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वाघमारे, ठाकूर समाजाचे अध्यक्ष यशवंत हंबीर, उपाध्यक्ष विश्वास भोई, राजू बांगारे, आदिवासी नेते रमेश पवार, दगडू वाघमारे, कृष्णा वाघमारे, दशरथ वालेकर व लक्ष्मण पवार हे प्रातिनिधिक स्वरूपात उपस्थित होते. सदर निवेदन निवासी जिल्हाधिकारी डॉक्टर पद्मश्री बैनाडे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

## नवोदित साहित्यिकांकडून उद्याच्या आदर्शवत साहित्याची निर्मिती : प्रा. एल.बी.पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवोदित साहित्यिकांकडून उद्याच्या आदर्शवत साहित्याची निर्मिती होऊ शकते असे मत रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील यांनी नवलेखक, कविता लेखन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्ह्याच्या अध्यक्ष सुधीर शेठ होते.

रायगड जिल्ह्याच्या माणगाव तालुक्यातील वडघर येथील साने गुरुजी स्मारक येथे झालेल्या नवलेखक,कविता लेखन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई आणि कोकण मराठी साहित्य परिषद उरण-रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित केलेल्या या कार्यशाळेच्या कार्यक्रमास कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्ह्याचे पदाधिकारी अ.वि. जंगम,संजय गुंजाळ,गणेश कोळी,ॲड.गोपाळ शेळके,सुखद राणे तसेच शिवव्याख्याते प्रशांत देशमुख उपस्थित होते.

यापुढे बोलताना प्रा.एल.बी. पाटील यांनी, नवोदित साहित्यिकांनी साहित्य निर्मिती केली पाहिजे. साहित्यातून मराठी भाषेचे संवर्धन होते.कोकण मराठी साहित्य परिषदेने अनेक साहित्यिक घडले आहेत असे सांगितले. कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष सुधीर शेठ यांनी आपल्या भाषणात, नवोदित साहित्यिकांकडून समाज मनाची आंदोलने झाली पाहिजेत. साहित्य निर्मिती करताना ती सक्षम असली पाहिजे. साहित्यिक कार्यक्रमातून कवींच्या कवींवर संस्कारांचे मार्गदर्शन झाले पाहिजे असे सांगितले.

यावेळी झालेल्या अभिजात मराठी भाषा या चर्चासत्रात ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, शिवव्याख्याते प्रशांत देशमुख, प्रशासकीय अधिकारी संजय माने यांनी सहभाग घेतला. बोली भाषेतील कविता या झालेल्या चर्चासत्रात डॉ. राजेंद्र राठोड, कवी नामदेव बरतोड,अरुण इंगोले, संध्या देवकर यांनी सहभाग घेतला. तसेच कविता कशी स्फुरते? या झालेल्या चर्चासत्रात गझलकार ज्योत्स्ना रजपूत, कवी अजित शेडगे, गंगाधर पालवी सहभाग घेतला. शेवटी कवींच्या रचना या झालेल्या कविसंमेलनात सहभागी ४३ कवींनी आपल्या कविता सादर केल्या, त्यांना संयोजकांच्यावतीने प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत बारटक्के यांनी केले.




## सुरगडावरील भग्न अवशेष झाले पुनरुज्जीवित ; दुर्गवीर प्रतिष्ठानची सुरगड संवर्धन व स्वच्छता मोहीम फत्ते

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

मुंबई गोवा महामार्गालगत असलेल्या सुरगड किल्ल्यावर प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून दुर्गवीर प्रतिष्ठानने नुकतीच संवर्धन व स्वच्छता मोहीम राबविली. यावेळी सुरगडावरील एका सदरेला पुनर्जीवित करून चौथरा उजेडात आणण्यात आला.



यामोहिमेत गडावरील परिसरात वाढलेले गवत, झाडी काढून तिथला परिसर साफ करण्यात आला. तसेच गडावरील सदरेचे अस्ताव्यस्त पडलेले दगड व्यवस्थित ठेऊन तिथला परिसर स्वच्छ केला गेला व सदरेला पुनर्जीवित केले गेले. जेणेकरून नवीन पर्यटकांना इथे सदर होती हे लक्षात येईल. ही काम खूप महत्त्वाची असतात, कारण काळाच्या ओघात या वास्तू जमिनीखाली जाण्याची शक्यता असते. म्हणून त्यांचे योग्य पद्धतीने उत्खनन करून त्यांना मोकळे करावे लागतात. आणि तेच काम या मोहिमेत करण्यात आले. त्याच बरोबर गडाच्या पाठच्या बाजूला कातळात कोरलेल एक भुयार सुद्धा निदर्शनास आले. भविष्यात ते साफ करण्याचा दुर्गवीरचा मानस आहे. या सुरगड मोहीमेत एकनाथ अस्वले, अमित शिंदे, स्वप्नील चेंबूरकर, सुरेश उंडरे, सुमित जाधव, अमित जाधव, विशाल बामणे, प्रतिक इंदुलकर, जयवंत कोळी, अजित राणे, प्रतिक पाटेकर व किशोर असे एकूण १२ शिलेदार सहभागी झाले होते.

या किल्ल्यावर दुर्गवीर प्रतिष्ठान १० हुन अधिक वर्ष संवर्धन व स्वच्छता मोहीम राबवित आहे. यामध्ये गडावरील अनेक मोठी पाण्याची टाकी, पायवाटा अनेक लुप्त झालेल्या वास्तू, सदरे, चौथरे दुर्गवीरांनी स्वच्छ करून उजेडात आणल्या आहेत. तर माहिती फलक देखील बसविण्यात आले आहेत.

# डोंगरोली खालचीवाडी ग्रामस्थ करणार राष्ट्रवादीतून शेकापमध्ये जाहीर प्रवेश : रमेश मोरे

**दै.रायगड नगरी । माणगाव**

मागील महिन्यात मोरबा जिल्हा परिषद मतदार संघात विकास कामांचा धुमधडाका शेकाप सर्वे -सर्वा आमदार भाई जयंत पाटील यांच्या हस्ते व माजी आमदार पंडित पाटील यांच्या हस्ते पार पडला.त्यानंतर देखील या जि प मतदारसंघातील सदस्या आरती रमेश मोरे व माणगाव तालुका शेकाप चिटणीस रमेश मोरे यांनी विकासकामांचा झंझावात कायम ठेवला आहे.या मुळे शेतकरी कामगार पक्षाच्या विकासात्मक कार्यप्रणालीवर व जेष्ठ नेत्यांच्या कामावर विश्वास ठेवत या जि. प मतदार संघातील असंख्य ग्रामस्थ शेतकरी कामगार पक्षात प्रवेश करण्यास उद्युक्त झाले असल्याची माहिती रमेश मोरे यांनी आपल्या कार्यालयात ग्रामस्थांच्या सोबत पत्रकार परिषद घेत दिली आहे.



या पत्रकार परिषदेला शेकाप तालुका चिटणीस रमेश मोरे यांच्यासह डोंगरोली खालचीवाडी गाव अध्यक्ष भागोजी डोंगरे, राजेंद्र डोंगरे, सेक्रेटरी बाबुराव डोंगरे, ग्रा. पं. सदस्य गणेश डोंगरे, विलास मोरे आदी डोंगरोली ग्रामस्थ उपस्थित होते. यातील शेकाप प्रवेश कार्यकर्ते माणगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष यांच्या कार्यप्रणाली वर नाखूष असल्याचे व त्यांच्या मनमानी कारभाराबाबत वैतागलेले असल्याची माहिती देखील सदर पत्रकार परिषदेतुन देण्यात आली आहे.

याच धर्तीवर माणगांव तालुक्यातील डोंगरोली ग्रामपंचायत हद्दीतील खालचीवाडी येथील शेकडो ग्रामस्थ दि. ४ फेब्रुवारीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश करणार आहेत. शेकाप आम जयंत पाटील, मा. आमदार पंडित पाटील, शेकाप जेष्ठ नेते अस्लम राऊत, जि.प.सदस्या आरती रमेश मोरे, शेकाप तालुका चिटणीस रमेश मोरे, माजी जि.प सभापती अशोक गायकवाड, डोंगरोली माजी सरपंच संजय गायकवाड यांच्या कार्यप्रणालीवर प्रेरित होऊन डोंगरोली ग्रामपंचायत सरपंच यांच्यासाहित गाव कमिटी अध्यक्ष येत्या ४ फेब्रुवारी रोजी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश करत आहेत अशी माहिती प्रवेशकर्त्या ग्रामस्थांसोबत बसून शेकाप तालुका चिटणीस रमेश मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

गणेश जयंतीच्या शुभमुहूर्तावर शेकाप पक्ष प्रवेशाचा नारळ फोडणार आहे. शेकापतर्फे डोंगरोली ग्राम पंचायत हद्दीत ३० ते ३२ लाखांची विकासकामे करण्यात आली आहेत. ऐन निवडणुकीच्या तोंडावर हा पक्ष प्रवेश होणार असल्याने अगोदरच माणगाव नागरपंचायत मधील पराभव जिव्हारी लागला असताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला या पक्षप्रवेशाचा चांगलाच फटका बसणार असल्याची चर्चा माणगाव तालुक्यातील राजकिय वर्तुळात रंगली आहे..